

नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे येथे कार्यरत असलेले श्री.अशोक प्रभाकर बरडे, उप कार्यकारी अभियंता टप्पा-१ यांची कन्या कु.नीरजा ही के.के. वाघ, इंजिनिअरींग कॉलेज नाशिक येथे शिकत असून ती द्वितीय वर्षाला एस.ई. (इलेक्ट्रिकल) ला कॉलेजमधून प्रथम व पुणे विद्यापीठातून ५ वी आली आहे.



श्री.नरेंद्र गोविंदराव यावले, कारागीर-क, कोहावि, औ.वि.कें., चंद्रपूर यांचे पाल्य चि.अनिकेत याने इयत्ता ८वी MS-CIT परिक्षेत ९८% गुण संपादन केले.



कोळसा हाताळणी विभाग, कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील सहाय्यक अभियंता श्री.सिताराम चिंचोरिया यांच्या कन्येने सी.बी.एस.ई. च्या दहावीच्या परीक्षेत अभूतपूर्व यश संपादन कले आहे. मॉडर्न स्कुल, कोराडी या शाळेची विद्यार्थिनी असलेल्या कु.श्रेया हिला ९७.८% (४८९/५००) गुण प्राप्त झाले असून संस्कृत व गणित या दोन विषयांत तिने १००% गुण मिळविले आहेत. टेबलटेनिस व कॅसिओ वादन हे तिचे छंद आहेत.



श्री.गजानन स.चौगुले दुय्यम अभियंता, पोफळी ज.वि.कें. यांचा मुलगा प्रणव, इ. ५वी याने 'प्रज्ञा गणित' या महाराष्ट्र अध्यापक महामंडळ यांचे वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये विशेष गुणवत्ता संपादन केली आहे. इयत्ता ४ थी स्कॉलरशिप मध्ये ९१% इतके गुण मिळाले आहेत.



कुमारी निखिता चरखा हिने महाराष्ट्र राज्य माध्यमिक चे उच्चमाध्यमिक मंडळाचे वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परिक्षेत ९२.१७ टक्के गुण मिळवून यश संपादन केले. तिला गणित विषयामध्ये १०० पैकी १०० गुण मिळालेले आहेत. ती जनता महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून तिचे वडील रामेश्वर चरखा चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रामध्ये सहाय्यक अभियंता म्हणुन कार्यरत आहेत. तिला व्हॉलीबॉल या खेळामध्ये विशेष आवड आहे. कु.निखिता हिला भविष्यात इंजिनिअर बनण्याची इच्छा आहे.

## रविंद्र कटारे यांना अखिल भारतीय नाट्य 'गुणवंत कलावंत' पुरस्कार



कॉर्पोरेट कार्यालय, मुंबई येथे प्रमुख लिपिक या पदावर काम करीत असलेले श्री.रविंद्र हरिश्चंद्र कटारे यांचा अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या मुंबई शाखेतर्फे 'गुणवंत कलावंत' म्हणून गौरव मा.छगन भुजबळ व मा. नारायण राणे यांचे शुभहस्ते करण्यात आला. श्री.कटारे यांनी महानिर्मितीच्या त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य व कामगार नाट्यस्पर्धेत सलग दरवर्षी सहभाग घेऊन रंगदेवतेची प्रदीर्घ सेवा केली आहे. ते स्वत: नाट्यलेखक, नाटयदिग्दर्शक व नाट्यअभिनेता म्हणून यशस्वीपणे मराठी नाट्य संस्कृतीसंवर्धनाचे कार्य करीत आहेत.

## कु.स्नेहा महाजनने पटकाविले ॲकेडमी एक्सलन्स ॲवार्ड



सिंहगड इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट, पुणे येथील मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एम.सी.ए.) या अभ्यासक्रमात कु.स्नेहा संजीवकुमार महाजन हिला ॲकेडमी एक्सलन्स ॲवार्डने गौरवण्यात आले. यापूर्वीही कु.स्नेहाने बी.एस.सी. (माहिती तंत्रज्ञान) मध्ये उत्तर महाराष्ट्र विद्यापिठातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. शालेय शिक्षणात, दहावी, बारावीच्या परीक्षांमध्येही यशाचा चढता आलेख कायम ठेवणारी कु.स्नेहा ही दीपनगर औष्णिक विद्युत केंद्र, भुसावळ येथे कार्यरत सहाय्यक अभियंता श्री.संजीवकुमार मनोहर महाजन यांची सुकन्या आहे.



A research abstract of S.S. Bagchi, Chemist at the WTP-II Koradi Thermal Power Station has been accepted for presentation at the 12th EucheMS International University, Sweden. Mr. Bagchi has received a grant of 250 Euro as registration fee support from the organizing committee.

The Conference is to be hosted jointly by the Stockholm University, Swedish Chemical Society and European Association for Chemical & Molecular Sciences.

This conference will be held from 14th June to 17th June 2009. The title of the abstract is 'Evaluation of nutrient supply from Indian fly ash and urine' a topic in sustainable environmental chemistry. He is also selected as reviewer for a peer reviewed International journal 'IJEST' of Tehran University, Iran.

## 'मी रुपवती' स्पर्धेत रश्मी दोंदे तृतीय



लोकमत सखी मंच आणि आर.एफ. १८५४ यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे संपन्न झालेल्या 'मी रूपवती' स्पर्धेत रश्मी जगदिश दोंदे तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली.स्वपरिचय, बुद्धिमत्ता, हजरजबाबीपणा सभाधीटपणा या गुणांचा कस लावणाऱ्या 'मी रूपवती' स्पर्धेत परिक्षकांनी विचारलेल्या, राजकारणातील प्रवेश, घराची संकल्पना, एकत्रित कुटूंबपद्धती, आयुष्यातील महत्वाचा क्षण, वाहिन्या व इंटरनेटचे परिणाम यासह विविध प्रश्नांची उत्तरे व त्यावरील खुले मत प्रदर्शित करून कु.रश्मी हिने तृतीय क्रमांक पटकावला, परिक्षक म्हणून सौ.रेखा नाडगौडा, डॉ.मृणाल केळकर, सौ.शर्वरी लथ व सौ.मुग्धा लेले यांनी काम पाहिले.स्थापत्य - १, कार्पोरेट कार्यालय, धारावी, मुंबई येथील उप मुख्य लेखाधिकारी श्री.जगदिश भिकदेव दोंदे यांची कु.रश्मी ही सुकन्या आहे.

## सौ.विद्या दळवी यांना ''उत्कृष्ट महिला अग्निक'' चा द्वितीय पुरस्कार



चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र वसाहत ऊर्जानगर येथे अग्निशमन सेवा सप्ताहा निमित्त अग्निशमन विभागातर्फे ''उत्कृष्ट महिला अग्निक''ची निवड करण्यासाठी १) स्वयंपाक घरातील आग विझविणे २) अग्निशमकाचे साहाय्याने आग विझविणे, अशा दोन स्पर्धा महिलांकरिता घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र दवाखान्यातील कार्यरत परिचारिका सौ.विद्या सतिशचंद्र दळवी यांनी ''उत्कृष्ट महिला अग्निक'' म्हणून द्वितीय क्रमांक पटकाविला. त्यांना श्री.विजय सिंह मुख्य महा व्यवस्थापक श्री.कार्तिक वाघमारे श्री.चव्हाण श्री.चौधरी मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे उपस्थितीत मा.श्री. सिद्धार्थ वाघमारे, महा व्यवस्थापक यांचे हस्ते गौरविण्यात आले.